# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

## **लैंगिक छळ प्रतिबंध धोरण** (POSH Policy)

1. **प्रस्तावना** -

या धोरणाचा उद्देश, बँकेत कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान, सुरक्षितता आणि समान वागणूक सुनिश्चित करणे. बँकेच्या कार्यालयात व कार्यालयीन कामकाज वेळेत महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ व तसा प्रयत्न करणे हा एक गंभीर गुन्हा असून तो सहन केला जाणार नाही. हे धोरण महिला कर्मचारी लैंगिक छळ प्रतिबंध आणि निवारण अधिनियम, 2013 अनुसार तयार केले आहे.

2. **उद्दिष्टे**

* कार्यस्थळी सर्व महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक वागणूक देणे व तसे वातावरण निर्मिती करणे.
* लैंगिक छळाच्या घटना टाळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्वे देणे.
* तक्रारीचे त्वरित, गोपनीय आणि न्याय निवारण करणे.

3. **लागू क्षेत्र**

हे धोरण बँकेतील सर्व महिला कायम तसेच कंत्राटी, प्रशिक्षणार्थी, प्रोबेशनरी, महिला कर्मचारी महिलांना लागू होईल.

4. **लैंगिक छळाची व्याख्या**

लैंगिक छळ म्हणजे खालील कोणतेही वर्तन

1. अश्लील किंवा अवांछित शारीरिक, मौखिक किंवा लिखित वर्तन.
2. अनुचित स्पर्श, इशारे किंवा नजरा.
3. अश्लील विनोद, टिप्पणी किंवा संदेश.
4. लैंगिक स्वरूपाचे आमिष, धमकी किंवा दबाव.
5. कामाशी संबंधित लाभासाठी लैंगिक कृतीची मागणी.

5. **अंतर्गत समिती** (Internal Complaints Committee - ICC)

अधिनियमानुसार बँकेत अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली जाईल.

समितीचे स्वरूप :

- अध्यक्ष : समितीमध्ये अध्यक्ष हया महिला असावी.
- किमान दोन महिला सदस्य (कर्मचारी)
- एक बाह्य सदस्य (ज्यांना सामाजिक कार्याचा अनुभव आहे अशी व्यक्ती) समितीमधील एकुण सदस्यापैकी 1/2 सदस्य हया महिला असणे आवश्यक.

6. **तक्रार नोंदविण्याची पद्धत**

* महिला कर्मचारी लेखी स्वरूपात तक्रार घटना घडलेपासून 3 महिन्यांच्या आत नोंदवू शकते.
* तक्रार अंतर्गत तक्रार समितीकडे अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष, पोस्टाने किंवा ईमेलद्वारे पाठवू शकते.
* तक्रारीची तपासणी समिती 90 दिवसांच्या आत पूर्ण करेल.

7. **कारवाई व दंड**

तक्रारीमध्ये सत्यता आढळल्यास -
* संबंधित आरोपीवर शिस्तभंगाची कारवाई, निलंबन, नोकरी समाप्ती किंवा इतर योग्य शिक्षा दिली जाईल.
* पीडितेला आवश्यक मदत व संरक्षण पुरवले जाईल.

8. **गोपनीयता**

तक्रार तपास प्रक्रिया आणि अहवाल पूर्णपणे गोपनीय ठेवले जातील. गोपनीयतेचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

9. **जागरूकता उपक्रम**

* POSH कायदा व धोरणाविषयी दरवर्षी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातील.
* धोरणाची प्रत सर्व शाखांना दिली जाईल व त्याची माहिती सर्व महिला कर्मचाऱ्यांना दिली जाईल

10. **वार्षिक अहवाल**

अंतर्गत कमिटीने वर्षातून एकदा आपला अहवाल बँकेकडे आणि जिल्हा ऑफिसकडे सादर करणे आवश्यक.

11. **अंमलबजावणी**

हे धोरण बँकेच्या सन्मा. व्यवस्थापक मंडळाच्या मान्यतेने लागू होईल आणि आवश्यकतेनुसार आढावा घेणेत येवून त्यामध्ये सन्मा. व्यवस्थापक मंडळाच्या मान्यतेने बदल केले जातील.